**सूचनापत्र :**

NMC/EST/OWL/२०२१/
नाशिक महानगरपालिका,नाशिक
जा.क्र.आस्था/वशि/ ८७६ /२०२१
दिनांक २०/ ०८/२०२१

**विषय**:- नाशिक महानगरपालिकेच्या सेवेत असताना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे वारसांना अनुकंपा तत्वावर नियुक्त्या देण्याबाबत..

**संदर्भ**:- १) महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:अकंपा-१२१७/प्र.क्र. १०२/आठ, दिनांक २१ सप्टेंबर,२०१७.

२) शासन निर्णय नगरविकास विभाग एमसीओ-२०१९/प्र.क्र.११७/नवि-१४, दिनांक ११ जुलै,२०१९.

३) शासन पत्र क्रमांक: नामपा-२०१६/प्र.क्र.१२०/नवि-२५, दिनांक १९ जानेवारी,२०२१

नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विविध संवर्गात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे सेवेत असताना निधन झालेले आहे. अशा कर्मचाऱ्यांच्या वारसांनी त्या-त्या वेळी अर्ज करुन अनुकंपा तत्त्वावर नाशिक महानगरपालिका सेवेत नोकरी मिळणेसाठी विनंती केलेली आहे.

राज्य शासनाच्या दिनांक १९/०१/२०२१ च्या पत्रानुसार अनुकंपा नियुक्ती योजनेतंर्गत नियुक्त्या करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार नाशिक मनपाने कर्मचारी निवड समिती गठीत केलेली आहे. समितीने वेळोवेळी घेतलेल्या बैठकांमध्ये आलेले अर्ज व अनुषंगिक आवश्यक असलेली कागदपत्रे याची छाननी केलेली आहे. कर्मचारी निवड समितीचे इतिवृत्त समवेत जोडलेले आहे. इतिवृत्तात संबंधित अर्जदाराची नमूद करण्यात आलेली माहिती / तपशिल किंवा कर्मचारी निवड समितीने नमूद केलेले अभिप्राय याबाबत अर्जदारांपैकी कोणाची काही हरकत असल्यास किंवा अर्जदारास अनुषंगिक कागदपत्रे पुर्तता करावयाची असल्यास सदरची सूचना प्रसिध्द् झाल्यापासून सात दिवसाचे आत dmc_gad@nmc.gov.in या ई-मेल आयडीवर ई-मेलव्दारे किंवा पोष्टाव्दारे सादर करण्यात यावी. मुदतीनंतर केलेल्या पत्रव्यवहाराचा विचार केला जाणार नाही,याची नोंद घ्यावी.

२०/०८/२०२१
(कैलास जाधव)
आयुक्त
नाशिक महानगरपालिका,नाशिक

**प्रत कार्यवाहीसाठी** :

१) संगणक विभागप्रमुख,माहिती व तंत्रज्ञान विभाग

/- उपरोक्त सूचनापत्र व कर्मचारी निवड समितीचे इतिवृत्त pdf स्वरुपात (Soft Copy) समवेत देण्यात येत आहेत. सदरचे सूचनापत्र व कर्मचारी निवड समितीचे इतिवृत्त नाशिक महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दिनांक २१/०८/२०२१ रोजी प्रसिध्द् करण्यात यावे.

२) जनसंपर्क अधिकारी,नाशिक मनपा

/- उपरोक्त सूचनापत्र व कर्मचारी निवड समितीचे इतिवृत्त नाशिक मनपाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द् केले असल्याबाबत स्थानिक वर्तमानपत्रात बातमीरुपाने प्रसिध्दी देण्यात यावी.